नवी आशा नवी दिशा
सार्वमत

भोर विद्यालयाच्या १८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

ठाणगाव (वार्ताहर)– येथील रयत शिक्षण संस्थेचे पुंजाजी रामजी भोर विद्यालय व डॉ. अण्णासाहेब शिंदे कनिष्ठ महाविद्यालयाच्या १८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली असून शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थ्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. पर्यवेक्षक भाऊसाहेब तोरकड अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून बाबुराव कांगणे, सुदाम शिंदे, गौरव व्यवहारे उपस्थित होते. त्यांच्याच हस्ते शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

पंकजा मुंडे यांचा सत्कार

सिन्नर (वार्ताहर)– भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांना विधानपरिषदेची उमेदवारी मिळाल्याबद्दल येथील पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथे त्यांची भेट घेवून सत्कार केला. भाजपाचे भटक्या विमुक्त आघाडीचे राज्य अध्यक्ष राहुल केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. राज्य उपाध्यक्ष मुकुंद काकड यांनी मनोगत व्यक्त केले. मुंडे यांच्या हातून समाजाची व राज्यातील जनतेची सेवा घडावी, जनतेचे प्रश्न सोडवण्यासोबतच महिलांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्या प्रयत्न करतील अशी आशा काकड यांनी व्यक्त केली.

महत्त्वाचे

रामनाथ सदाफळ एलएलबी उत्तीर्ण

राहाता (वार्ताहर)– येथील बिरोबा महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष रामनाथ सदाफळ नुकतीच बी.ए.एल.एल.बी परीक्षा उत्तीर्ण झाले आहे. सदाफळ यांनी राहाता शहरात सामाजिक उपक्रम राबवून मनसेच्यावतीने जनकल्याणसाठी विविध प्रकारचे आंदोलन केली. शिवजयंती निमित्ताने अनेक शाळा मध्ये शिवजयंती साजरी करून मुलांना शालेय साहित्य मिठाई वाटप गरजू विद्यार्थ्यांना कपडे वाटप केले. राहाता येथे जगद्गुरू संत तुकाराम महाराज मंदिर उभारून संत तुकाराम महाराज यांची गाथा, हरिपाठ, श्रीमद भगवत गिता भाविकांना भेट दिली. राहाता येथील पी. जे. एस. एस शाळेतील विद्यार्थ्यांना सांस्कृतिक कार्यक्रम स्टेज साठी आर्थिक मदत लेझीम साहीत्य शालेय कामी गार्डन पाणी पाईप भेट दिली. वंचित, पीडित, निर्धन लोकांचे न्याय हक्कासाठी यापुढेही सामाजिक जाणीव ठेवून कार्य करणार असल्याचे सदाफळ यांनी सांगितले.

स्वाती त्रिभुवन यांना व्यसनमुक्ती सेवा सन्मान पुरस्कार

शिरसगाव (वार्ताहर)– तालुक्यातील हरेगाव येथील सामाजिक कार्यकर्त्या स्वाती कैलास त्रिभुवन यांना राज्यस्तरीय राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण ९ जुलै रोजी मुंबई येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान नाट्यगृह येथे विधान परिषदेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते होणार आहे. स्वाती त्रिभुवन यांची निवड व्यसनमुक्ती परिषदेच्या प्रदेशाध्यक्षा प्रा. अंजली पाटील, प्रदेश सरचिटणीस आजिनाथ शेरकर यांनी केली आहे. पुरस्कार वितरणासाठी परिवहन मंत्री अनिल परब, महादेव जानकर, रोहिणी खडसे, आ.हिरामण खोसकर, आ. अभिमन्यू पवार, बसवराज पाटील, नागराळकर, अभिजीत राणे, संजय शेटे, बाबा कदम, शिरीष वडजे, डॉ. राजकुमार गवळी आदी उपस्थित राहणार आहेत.

दिग्विजय बडे याचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– इयत्ता ५ वी राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत दिग्विजय नवनाथ बडे हा विद्यार्थी २६० गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत आला आहे. दिग्विजय हा एस.के. सोमैया प्राथमिक विद्यामंदिर, श्रीरामपूर या शाळेचा विद्यार्थी असून या यशाबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पैठणे, वर्ग शिक्षिका श्रीमती गवळी, श्रीमती भालदंड यांचे दिग्विजयला मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग काउन्सिल सदस्या मीनाताई जगधने व प्राचार्य प्रवीण बडधे यांनी त्याचे कौतुक केले.

महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत मॉडेल इंग्लिश स्कूलचे घवघवीत यश

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– येथील दशमेश एज्युकेशन सोसायटी संचलित मॉडेल इंग्लिश स्कूलने महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

दि. २३ एप्रिल रोजी सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयातील इयत्ता आठवी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी विद्यालयातील इयत्ता आठवीतील प्रियाली आसने हीस तालुकास्तरीय बक्षीस प्राप्त झाले. राहील शेख, रवि कुमार यादव, भक्ती यादव यांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. इयत्ता दहावी ओम पाचपिंड, मोहम्मदअली शेख यांना विशेष बक्षीस मिळाले. आणि मुलाखत राऊंडसाठी निवड झाली होती. सार्थक येलवंडे यास तालुकास्तरीय तर प्रेरणा आसने हीस उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त झाले. संस्थेच्या अध्यक्षा मैमकौर सेठी, सेक्रेटरी बलजीतकौर सेठी, संचालक रतनसिंग सेठी, मुख्याध्यापिका तृप्ती करीर, सर्व पदाधिकारी, अध्यापन करणारे शिक्षक यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

नेवाशात ध्यान मंदिराचे लोकार्पण

नेवासा (तालुका वार्ताहर)– श्री संत ज्ञानेश्वर मंदिर देवस्थान विश्वस्त मंडळ व शहरातील इंजिनियर्स ग्रुप सदस्य भास्करराव शिंदे यांच्या संकल्पनेतून लोकवर्गणीतून ज्ञानेश्वर मंदिरातील तळघरामध्ये ध्यान मंदिराची निर्मिती करण्यात आली असून त्याचे लोकार्पण ज्ञानेश्वर मंदिराचे देविदास महाराज म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग होते.

प्रमुख पाहुणे म्हणून विवेकानंद आश्रमाचे ज्ञानेश्वर महाराज, नंदकुमार खरात महाराज व ज्ञानेश्वरीच्या अभ्यासक गायत्रीताई वाघ उपस्थित होत्या. देविदास महाराज म्हस्के यांनी सांगितले नेवासा शहरवासी यांचे नशीब अत्यंत चांगले आहे त्यांना ध्यानासाठी अत्यंत चांगली भूमी आणि ज्ञानेश्वर माऊलीच्या पायाशी ध्यान मंदिर उपलब्ध झाले आहे याचा सर्वांनी उपयोग करून घ्यावा कारण या ठिकाणी ज्ञानेश्वरांचा लौकिक वावर आहे.

अध्यक्ष पांडुरंग अभंग म्हणाले की ध्यान मंदिराची कल्पना सुचणे हीच मोठी घटना आहे. या प्रकल्पाला मूर्त स्वरूप देणाऱ्या सर्व इंजिनियर्सचे त्यांनी कौतुक केले. विवेकानंद आश्रमाचे ज्ञानेश्वर महाराज आणि श्रीमती वाघ यांनी देखील ध्यानाचे महत्त्व सांगणारे मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक सुनील वाघ यांनी केले. सूत्रसंचालन निलेश जोशी यांनी केले तर आभार डॉ. संजय सुकाळकर यांनी मानले. उपक्रमाला सहाय्य करणाऱ्या सर्वांचा विश्वस्त रामभाऊ जगताप, कैलास जाधव, संभाजी पवार, पुष्कर शिंदे यांच्या हस्ते तुळशीचे रोप देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सहज ध्यान योगाचे सर्व सदस्य महेश मापारी, योगेश रासने, नितीन खंडाळे, सतीश पिंपळे, जयकुमार गुगळे, डॉ. अर्जुन शिंदे, अभय गुगळे, बाळासाहेब शिंदे उपस्थित होते.

देवळाली प्रवरा येथे विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

हलगर्जीपणा केल्याने एकावर गुन्हा दाखल

देवळाली प्रवरा (वार्ताहर)– राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील खटकळी परिसरातील ३० वर्षीय तरुणाचा विजेच्या मुख्य तारेला स्पर्श होऊन विजेचा धक्का बसल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना शनिवारी घडली. नारळाच्या झाडाच्या फांद्या तोडत असताना ही घटना घडली असून विद्युतरोधक साधने न देता हलगर्जीपणा करुन त्यास नारळाच्या फांद्या तोडण्यास लावल्याने एका विरुद्ध राहुरी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देवळाली प्रवरा येथील खटकळी येथे रहिवासी असलेला मनोज दामोदर उमाप (वय ३०) हा झाडे तोडण्याचे तसेच मोलमजुरीचे काम करत असत. शनिवार दि. ६ जुलै रोजी देवळाली प्रवरा येथील राजवाडा चौकात नारळाची फांदी तोडत असताना विजेच्या मुख्य प्रवाह असलेल्या तारेला मनोज याचा चुकून हात लागल्याने तीव्र धक्का बसून तो खाली पडला. त्यानंतर त्यास तातडीने रुग्णवाहिकेतून राहुरी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. तेथील वैद्यकीय सूत्रांनी मृत घोषित केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. मयत मनोज याच्या पश्चात आई, वडील, दोन भाऊ, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान मयत मनोज हा सुरेश पंडीत याच्याकडे नारळाचे फांद्या तोडण्याच्या मजुरीच्या कामासाठी गेला असता नारळाच्या झाडामधून गेलेल्या विजेच्या तारामध्ये विद्युत प्रवाह असताना त्याकरिता कोणतीही विद्युतरोधक साधने न देता हलगर्जीपणा करून त्यास फांद्या तोडण्यास लावल्याने सदर तारांचा मनोज यास धक्का बसून मृत्युमुखी पडल्याची फिर्याद मयत मनोज याचा भाऊ सुनील दामू उमाप याने राहुरी पोलिसांत दिली आहे. त्यानुसार सुरेश जयवंत पंडीत, रा. देवळाली प्रवरा याच्याविरूद्ध राहुरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मध्यमेश्वर पालखी दिंडीचे नेवाशातून प्रस्थान

नेवासा (शहर प्रतिनिधी)– नेवासा येथील प्रवरानदीच्या तीरावर असलेल्या मध्यमेश्वर मंदिरातील मध्यमेश्वर भगवान पालखी दिंडीचे शनिवारी पंढरपूरकडे प्रस्थान झाले. दहा दिवसामध्ये पंढरपुरात पोहचणारी दिंडी म्हणून या दिंडीची ओळख आहे.

बालयोगी ऋषीनाथजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या या दिंडीचे हे ३८ वे वर्ष आहे.

दिंडीच्या प्रस्थानाच्या पूर्वी बालयोगी ऋषिनाथजी महाराज यांच्याहस्ते श्री मध्यमेश्वर शिवलिंगास वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला. त्यानंतर ब्रम्हलिन योगी श्री मनोहरनाथ बाबांच्या मूर्तीस पुष्पहार घालून त्यांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी दिंडी चालक विजय महाराज पवार, देविदास महाराज पवार, रामभाऊ महाराज आढाव, गोपीनाथ कोरेकर, दिनकर हारदे, सुभाष दळवी, बबनराव वाखुरे, कैलास तनपुरे यांच्यासह शेकडो भाविक व वारकरी दिंडीत सहभागी झाले होते. याप्रसंगी महंत बालयोगी श्री ऋषिनाथजी महाराज म्हणाले की ब्रम्हलिन गुरुवर्य श्री योगी मनोहरनाथ बाबांनी शैव व वैष्णव एक व्हावे म्हणून ही दिंडी सुरू केली आहे. त्यामुळे हरि आणि हर यांची ऐक्य सांगणारी ही दिंडी समाजाला आदर्शवत संदेश देणारी आहे,व्हावे कल्याण सर्वांचे दुःखी कोणी असू नये ही भावना व्यक्त करत भरपूर पाऊस व्हावा बळीराजा सह सर्व सृष्टी सुखी व्हावी म्हणून विश्वात शांती नांदावी हीच प्रार्थना पांडुरंग परमात्म्याच्या चरणी करत त्यांनी दिंडीतील वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

मुंबादेवी मंदिरात ही दिंडी आली असता मुंबादेवी मंदिराचे महंत योगी बृहस्पतीनाथ महाराज, संतोष पडूरे, मोहिनीराज सरगैये यांच्या वतीने दिंडीचे स्वागत करण्यात आले.मध्यमेश्वर दिंडीच्या स्वागत प्रसंगी महिलांनी दारासमोर सडा रांगोळया घालून परिसर सुशोभित केला होता. दिंडीस शुभेच्छा देण्यासाठी बदाम पठाडे, विष्णुपंत नाबदे, विजय यादव, विष्णू नवसे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आजची पिढी संस्कार हरवून बसलीय

डॉ. संजय कळमकर : 'मुले घडवितानाची धडपड' विषयावर व्याख्यान

अहमदनगर (प्रतिनिधी)– पालकांच्या वाढत्या अपेक्षांमुळे मुले एटीएम बनलीत. केवळ पॅकेजच्या मागे लागल्याने ही पिढी संस्कार हरवून बसलीय. ज्ञान कुठेही मिळू शकते पण संस्कार करावेच लागतात. पालकांनीही त्यांची जबाबदारी ओळखली पाहिजे, असे प्रतिपादन साहित्यिक, व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांनी केले.

संस्काराअभावी मुलांमध्ये भावनिकतेची मोठी पोकळी निर्माण झालीय. ही पिढी संवेदनाच हरवून बसलीय. या पार्श्वभूमीवर प्रबोधन करण्याच्या हेतूने ग्रीन स्पार्क प्री स्कूल आणि सक्सेस अकादमीच्या वतीने मुले घडवतानाची धडपड या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. आपल्या नर्मविनोदी शैलीत त्यांनी पालकांना मार्गदर्शन करतानाच कानटोचणीही केली. सुमारे एक तास पालकांसोबत त्यांचा मुक्तसंवाद रंगला. पालकांनीही तितक्याच सहजतेने त्यांच्या आवाहनाला दाद दिली. डॉ. कळमकर म्हणाले, पालक आणि मुलांमधील संवाद हरवत चालला आहे. नोकरी किंवा उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने तो सतत बाहेर असतो. मुलांचे पालकत्वाची जबाबदारी पार पाडण्यासही त्याला वेळ नाही. हा केवळ बाप-लेकातील संवाद तुटलेला नाही तर पिढीत अंतर पडत आहे. ही दरीच सामाजिक स्वास्थ्य बिघडवित आहे. पूर्वीचे पालक मुलांविषयी बेफिकीर होते असे नाही. त्यांनाही काळजी होतीच. प्रत्येक पालकाला आपल्या मुलाने नाव कमवावे असे वाटत असते. परंतु त्याच्यावर अनावश्यक ओझे लादू नये. त्या ओझ्यामुळेच तो त्याच्यातील गुणवत्ता हरवून बसतो आहे. मूल हे रोपटे आहे. त्याच्याभोवती नक्कीच कुंपण केले पाहिजे. तसे केले नाही तर समाजातील जनावरे त्याचा शेंडा खुडतील. पण अति काळजीने ते रोप करपायलाही नको, असे ते म्हणाले.

> ▸ मुलगा हा वडिलांचे निरीक्षण करीत मोठा होतो. आपले वडील आजोबा-आजींसोबत कसे वागतात, हे तो पाहत असतो. आपण त्यांना काठी काढली तर तो भविष्यात आपल्याला पिस्तूल काढून सव्याज परतफेड करील. श्रीमंतांना समाजाचे देणे-घेणे नाही. आणि गरिबांचा त्याच्या पोटाची खळगी भरण्यातच वेळ जातो. समाजाची सर्व जबाबदारी मध्यमवर्गियांवरच आहे. त्यामुळे आपण सर्वांनी हे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे, असेही निरीक्षण डॉ. कळमकर यांनी नोंदवले.

दुधासाठी एमएसपी व भेसळ प्रतिबंधक कायदा करा

२५ जुलैपासून जनआंदोलन; शेतकरी संघटनेचा इशारा

नेवासा (शहर प्रतिनिधी)– उसाच्या एफआरपी प्रमाणे दुधाचा एमएसपी, दुध भेसळ प्रतिबंधक कायदा करावा या मागण्यांसाठी २५ जुलै पासून जनआंदोलन करणार असल्याचे शेतकरी संघटना राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

ते म्हणाले, राज्यात पिक विमा ही गंभीर समस्या झाली आहे. प्रशासनाचा गैरकारभार व हात मिळवणी यामुळे शेतकरी तसेच शासनाचा सुद्धा मोठा तोटा होत आहे. शासनाने नोटिफिकेशन उशिरा काढण्याचे सुद्धा विमा कंपन्यांकडून सांगण्यात येत असल्याने विमा मिळण्यास अनंत अडचणी येत आहेत.

शेतकरी विमा कंपन्यांसाठी हसे भरत असताना सर्व काही सुरळीत असते. त्यावेळी कोणतीही साईट हँग होत नाही सुरळीतपणे पैसे गोळा केले जातात. पण नंतर ज्यावेळी क्लेम करायचं त्यावेळी ऑफलाईनला सुद्धा प्रॉब्लेम असतो. टोल फ्री नंबर उचलला जात नाही. क्लेम करण्यासाठी ७२ तासांची अट घातली जाते. असे वेगवेगळ्या प्रकारे शेतकऱ्यांना अडचणीत आणले जाते. ज्या कंपनीला काम दिले आहे त्यांचे साधे कार्यालय तालुक्याच्या ठिकाणी नाही. या प्रश्नांबाबत तीन जिल्ह्यांच्या शेतकरी संघटनेने याचिका दाखल केल्या असून नगर जिल्ह्याची सुद्धा लवकरच याचिका दाखल करण्यात येणार असल्याचे अजित काळे यांनी स्पष्ट केले. नेवासा तालुक्यातील ५९ हजार शेतकऱ्यांनी विमा उतरला होता पैकी ३० हजार शेतकऱ्यांचे क्लेम झाले आहेत व सुमारे ११४ कोटी विमा कंपन्यांकडे थकलेले आहेत

दुधाला देशात सर्वात कमी भाव महाराष्ट्रात आहे. शासनाने ३४ रुपयाचे भाव स्वतःच पंचवीस वर आणले आणि आता निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ३० रुपये करीत आहे. शासनाच्या अनुदानावर आता शेतकऱ्यांचा विश्वास राहिला नाही त्यामुळे दूध व्यवसाय बाबतीत एमएसपीचा कायदा करावा. याशिवाय दुधाला ४० रुपये भाव द्यावा, शासनाने भेसळ प्रतिबंधक कायदा करावा या मागण्यासाठी यापुढील काळात आंदोलने करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेला जिल्हाध्यक्ष हरिअप्पा तुवर, युवाध्यक्ष डॉ. रोहीत कुलकर्णी, तालुका उपाध्यक्ष बाबासाहेब नागोडे, ॲड. बाळासाहेब कावळे, किरण लंघे, कैलास पवार, मेजर अशोक काळे दत्तात्रय निकम आदी पदाधिकारी हजर होते.

नवी आशा नवी दिशा सार्वमत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहमदनगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहमदनगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. • संपादक- * अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहमदनगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)